# मेट्रो ३ : ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गातील ४०व्या टप्प्याचे भुयारीकरण पार पडले असून, आतापर्यंत एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण करण्यात आल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून स्पष्ट करण्यात आले आहे. महापालिकेच्या १७ मीटर खोल भूमिगत गटार पम्पिंग स्टेशनजवळील भुयारीकरण हे आव्हानात्मक असल्याचे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले आहे.

तानसा १ या टीबीएम मशीनच्या माध्यमातून सायन्स म्युझियम मेट्रो स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो स्थानक हा ११३५.५ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ७५७ रिंग्जच्या सहाय्याने ३२५ दिवसांत पूर्ण करण्यात आला आहे. सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानकादरम्यान भुयारीकरण करणे आव्हानात्मक होते. या टप्प्यातील भुयारीकरण पश्चिम रेल्वे मार्गावरील महालक्ष्मी आणि लोअर परेल रेल्वे स्थानकांच्या दरम्यान थेट रेल्वे मार्गाच्या खालून करण्यात आले आहे. याशिवाय हे बोगदे जेकब सर्कल येथील महानगरपालिकेच्या १७ मीटर खोल भूमिगत गटार पम्पिंग स्टेशनच्या जवळ असल्याने भुयारीकरण जिकिरीचे असल्याचे सांगत एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी शिवधनुष्य यशस्वीरित्या



पेलल्याचे स्पष्ट केले आहे. मेट्रो ३ मार्गिकेतील पॅकेज ३ मध्ये पाच स्थानके असून, या मार्गिकेतील सर्वात लांब टप्पा असून, या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकाचा समावेश आहे.

**पॅकेज ३**

| भुयारीकरण | अपलाईन अंतर | डाऊनलाइन अंतर |
|---|---|---|
| सायन्स म्युझियम ते वरळी | २०७२ मीटर | २०५७ मीटर |
| सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी | १११७.५ मीटर | ११३५.५ मीटर |